# उपवनसंरक्षक, भंडारा वनविभाग, भंडारा यांचे कार्यालय

जयस्तंभ चौक, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर,भंडारा -441904

07184-252283 07184-253303 dycfbhandara@yahoo.com,


ई-मेल व्दारे

**विषय :- सुरेवाडा उपसा सिंचन योजना ता. जि. भंडारा**
37.512 हे. आर. च्या वनप्रस्तावास उपस्थित मुद्यांचे
अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत. **(सुधारीत पत्र)**

**क्रमांक**:-कक्ष/सर्व्हे/वनसंवर्धन/प्रक्र.292/ 3296 /2017-18
**भंडारा दिनांक-** 21/12/2018

**प्रति,**

कार्यकारी अभियंता
गोसीखुर्द उपसा सिंचन विभाग,
अंबाडी (भंडारा)

**संदर्भ** :- 1) केंद्रशासनाकडील पत्र क्र. F.No. FC-II/MH-41/2017-NGP/1891 Dated-12 June,2017
2) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष/सर्व्हे/वनसंवर्धन/प्रक्र.292/1070/दिनांक 10/07/2017
3) उपवनसंरक्षक, गोंदिया वनविभाग गोंदिया यांचे पत्र क्र. कक्ष-3/सर्व्हे/वनसंवर्धन/2109/ दि. 30/08/2017
4) वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, नवेगाव-नागझीरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया यांचे पत्र क्र. सर्व्हे/सुरेवाडा/2831/दि.9/11/2017
5) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष/सर्व्हे/वनसंवर्धन/प्रक्र.292/2193 दिनांक 23/11/2017

उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक 1 अन्वये सुरेवाडा उपसा सिंचन योजनेचा 37.512 हे. क्षेत्राचा वनप्रस्तावास केंद्रशासनाकडून काही अटिच्या अधिन राहून तत्वत: मंजूरी प्राप्त झालेली आहे. केंद्रशासनाकडील अटिची पुर्तता करण्यासंदर्भात वन्यजिव विभाग व गोंदिया वनविभाग यांच्या कडून आवश्यक माहीती संदर्भिय पत्र क्रमांक 3 व 4 अन्वये या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. त्याअनुषंगाने केंद्रशासनाकडील उपस्थित केलेल्या मुद्यानुसार पर्यायी रोपवन व नक्तवर्तमान मुल्य व वृक्षतोडीची रक्कम तसेच इतर रक्कमेचा भरना करण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर पत्रामध्ये अंशत: बदल करून खालील अटि नुसार रक्कमेचा भरणा करण्यात यावा. जेणे करून अटिपूर्तता अहवाल केंद्रशासनास सादर करने सोईचे होईल ही विनंती.

**अट क्रमांक** ii) सदर अटिनुसार प्रकल्पात बाधित 37.512 हेक्टरच्या दुप्पट 75.024 हेक्टर क्षेत्रावर सन 2017-18 या आर्थिक वर्षाकरीता पर्यायी वनिकरण घेण्याकरीता एकुण रक्कम रूपये 37251142/- ऐवढी रक्कम ई-चालान व्दारे कॅम्पामध्ये भरनाकरून छायांकित प्रत सादर करावी. सदर रक्कम सन 2017-18 या आर्थिक वर्षात भरना न केल्यास सन 2018-19 च्या दराप्रमाणे सुधारीत रक्कम भरना करावी. याची नोंद घ्यावी.

**अट क्रमांक** vi) सदर अटिनुसार बाधित क्षेत्राच्या अनुषंगाने वन विभाग निहाय NPV ची रक्कम खालील प्रमाणे.

1) भंडारा वनविभाग = 35.283 हे. X 803000 = 28332249
2) वन्यजिव विभाग = 0.650 हे. X 803000 = 521950
3) गोंदिया वनविभाग = 1.579 X 626000 = 988454
एकंदरीत रक्कम रू. = 29842652/-

**अट क्रमांक** viii) केंद्रशासनाकडील तत्वता मंजूरी पत्रातील अट क्रमांक ii, vi, x, xxviii, xlii नुसार एकंदरीत रक्कम रू. 85621826/- (अक्षरी आठ कोटी छप्पन्न लक्ष ऐकवीश हजार आठशे सव्वीस फक्त) ई-चालान व्दारे कॅम्पामध्ये भरना करून त्याची छायांकित प्रत या कार्यालयात सादर करावी.

**अट क्रमांक** x) सदर प्रस्तावात ओपन कॅनल प्रस्तावित असून त्यामध्ये 2 हे. पेक्षा कमी गटाच्या 25.085 हेक्टर वनक्षेत्रे विभाजित होत असल्याने त्याक्षेत्रावर रोपवन व संरक्षण कामाकरीता सन 2017-18 च्या दराप्रमाणे एकंदरीत रक्कम रूपये 17388032/- ऐवढी रक्कम ई-चालान व्दारे कँपामध्ये भरना करून त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.

**अट क्रमांक** xxviii) प्रस्तावित कॅनलची लांबी 16 किमी असून कॅनलच्या रूंदी सिमेवर सिमांकन / RCC पिल्लर लावण्याकरीता एकुण रक्कम रूपये 6,40000/- ऐवढी रक्कम ई-चालान व्दारे कँपामध्ये भरना करून त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.

**अट क्रमांक** xxxiii) सदर प्रस्तावामध्ये वन्यजिव विभाग / गोंदिया वनविभाग / भंडारा वनविभागातील क्षेत्रामध्ये झाडे तोड करणे अपेक्षीत असल्याने विभागनिहाय वुक्ष तोडीची रक्कम सबंधित वनविभाग /वन्यजिव विभाग यांचे नावे जमा करावी.

1) वन्यजिव विभाग = 370950/-
2) गोंदिया वनविभाग = 34446/-
3) भंडारा वनविभाग = 1400000/-
एकंदर एकुण = 1805396/-

**अट क्रमांक** xlii) सदर अटिनुसार पक्षांचे घरटयांकरीता एकुण 5.00 लाख रक्कम ई-चालान व्दारे कॅम्पा अंतर्गत भरना करण्यात यावी.

उर्वरीत अटि मान्य असल्याबाबत यंत्रणेकडून हमिपत्र देण्यात यावे. तसेच केंद्रशासनाकडील सर्वच अटिचा अनुपालन अहवाल आंग्ल भाषेत आवश्यकत्या दस्ताऐवजासह या कार्यालयास त्वरीत सादर करावा, हि विनंती.

**उपवनसंरक्षक,**
**भंडारा वनविभाग भंडारा**

**प्रतिलिपी** :- मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी महा. राज्य नागपूर यांना सहपत्राच्या प्रतिसह माहीती व पुढील कार्यवाहीस सादर.
**प्रतिलीपी** :- मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादे.) नागपूर यांना सहपत्राच्या प्रतिसह माहीती व पुढील कार्यवाहीस सविनय सादर.
**प्रतिलिपी** :- वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, नवेगाव-नागझीरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया यांना त्यांच्या कडील संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सहपत्राच्या प्रतिसह सविनय सादर.
**प्रतिलिपी** :- उपवनसंरक्षक, गोंदिया वनविभाग गोंदिया यांना त्यांचे कडील संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सहपत्राच्या प्रतिसह माहीतीस सहस्नेह अग्रेषित.